ePaper

सौदीत आणखी एका भारतीय नागरिकाचा मृत्यू; मृतांचा आकडा 6 वर

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 23 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




रूपाली चाकणकरच मुख्य सूत्रधार - रुपाली ठोंबरे

### ८,९३१ दिवस पूर्ण करत ठरले भारतातील सर्वाधिक काळ सरकार प्रमुख

# मोदींचा ऐतिहासिक विक्रम!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी ऐतिहासिक कामगिरी करत सिक्कीमचे माजी मुख्यमंत्री पवन कुमार चामलिंग यांचा विक्रम मोडला. गुजरातचे मुख्यमंत्री आणि पंतप्रधान म्हणून एकत्रित कार्यकाळ गाठत मोदी यांनी सरकार प्रमुख म्हणून तब्बल ८,९३१ दिवस पदावर राहण्याचा विक्रम केला, तर चामलिंग यांचा ८,९३० दिवसांचा विक्रम मागे पडला.**



नरेंद्र मोदी हे यापूर्वी गुजरातचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिले असून, मुख्यमंत्री म्हणून सर्वाधिक अनुभव असलेले ते देशाचे पंतप्रधान आहेत. तसेच, स्वातंत्र्यानंतर जन्मलेले ते पहिले पंतप्रधान ठरले आहेत. २०१४, २०१९ आणि २०२४ च्या सलग तीन लोकसभा निवडणुकांमध्ये त्यांनी आपल्या पक्षाला विजय मिळवून दिला आहे.

गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये सरकार प्रमुख म्हणून २५ वर्षांचा टप्पा पूर्ण करताना त्यांनी देशवासीयांचे आभार मानले होते. २००१ मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यापासूनच्या आपल्या प्रवासाचा आढावा घेत त्यांनी सांगितले की, लोकांचे जीवनमान उंचावणे आणि राष्ट्रीय प्रगतीत योगदान देणे हा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहिला आहे.

मोदी यांनी नमूद केले की, अत्यंत कठीण परिस्थितीत त्यांनी राज्याची धुरा सांभाळली. त्या वेळी गुजरात भूकंप, चक्रीवादळ, दुष्काळ आणि राजकीय अस्थिरतेच्या संकटातून सावरत होते. या आव्हानांनी राज्याची नव्या उमेदीने पुनर्बांधणी करण्याचा त्यांचा निर्धार अधिक बळकट केला. वैयक्तिक आठवण सांगताना त्यांनी आपल्या आईने दिलेला सल्ला अधोरेखित केला. 'गरिबांसाठी काम करा आणि कधीही लाच घेऊ नका', हीच मूल्ये त्यांच्या सार्वजनिक जीवनाला दिशा देणारी ठरली, असे त्यांनी म्हटले.

मोदी यांनी आपल्या कार्यकाळात गुजरातमध्ये झालेल्या बदलांचा उल्लेख करत राज्याने कृषी, उद्योग आणि पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय प्रगती साधत 'सुशासनाचे केंद्र' म्हणून ओळख निर्माण केल्याचे सांगितले. २०१३ मध्ये पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून नाव जाहीर झाल्याची आठवण करून देत त्यांनी २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या निर्णायक जनादेशाचे श्रेय देशातील जनतेला दिले.

## डिजिटल विश्वातही लोकप्रियता लक्षणीय

डिजिटल प्लॅटफॉर्मवरही पंतप्रधान मोदींचे वर्चस्व कायम आहे. त्यांच्या YOUTUBE चॅनेलने ३ कोटी (३० दशलक्ष) सबस्क्राइबर्सचा टप्पा ओलांडला असून, जागतिक नेत्यांमध्ये ते आघाडीवर आहेत. INSTAGRAM वर १० कोटींहून अधिक फॉलोअर्स असलेले ते जगातील पहिले सक्रिय नेते ठरले आहेत. सध्या त्यांचे १०.१ कोटी फॉलोअर्स आहेत. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर १०.६ कोटी फॉलोअर्ससह त्यांनी आपले जागतिक स्थान अधिक भक्कम केले आहे.



## सलग १३ वर्षे केले गुजरातचे नेतृत्व

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७ ऑक्टोबर २००१ रोजी पहिल्यांदा गुजरातच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळली होती. सलग १३ वर्षांहून अधिक काळ राज्याचे नेतृत्व केल्यानंतर, २१ मे २०१४ रोजी त्यांनी या पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर २६ मे २०१४ रोजी त्यांनी भारताचे १४वे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. पूर्ण बहुमतासह सत्तेत येणारे ते पहिले बिगर-काँग्रेस नेते ठरले, तसेच दोन कार्यकाळ पूर्ण करून तिसऱ्यांदा सलग सत्तेत परतण्याचा मानही त्यांनी मिळवला आहे.

## मोदींच्या नावावर अनेक विक्रमांची नोंद

पंतप्रधान मोदींच्या कारकिर्दीत अनेक महत्त्वपूर्ण विक्रमांची नोंद झाली आहे. यामध्ये ते गुजरातचे सर्वाधिक काळ सेवा देणारे मुख्यमंत्री आहेत. तसेच स्वतंत्र भारतात जन्मलेले देशाचे पहिले पंतप्रधान आहेत. तसेच २०१४, २०१९ आणि २०२४ अशा सलग तीन लोकसभा निवडणुकांमध्ये विजय मिळवून त्यांनी आपले राजकीय वर्चस्व अबाधित ठेवले आहे.

# रूपाली चाकणकरच मुख्य सूत्रधार

## भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणी रूपाली ठोंबरे पाटलांचा गंभीर आरोप

**महाईन्यूज । पुणे**

**अशोक खरातला महिलेच्या लैंगिक शोषण प्रकरणात अटक झाल्यानंतर विविध प्रकारचे आरोप प्रत्यारोप होत आहेत. आता रुपाली ठोंबरे पाटील यांनी रुपाली चाकणकर यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. रुपाली चाकणकर यांचे अशोक खरातची पूजा करतानाचे फोटो समोर आले आणि त्यानंतर वाद निर्माण झाला, ज्यानंतर रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाचं अध्यक्षपद सोडावं लागलं. दरम्यान रुपाली चाकणकर महिला आयोगाच्या अध्यक्षा असताना अशोक खरातच महिला आयोग चालवत होता असा गंभीर आरोप रुपाली ठोंबरे पाटील यांनी केला आहे.**





मी पक्षातली आहे म्हणून आरोप करत नाही. मी वकील म्हणून हे सगळे आरोप करते आहे. कारण रुपाली चाकणकर या भोंदूबाबा अशोक खरातच्या सेक्स रॅकेटच्या त्या मुख्य सूत्रधार आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायद्यानुसार जो तपास समोर आला आहे त्यानुसार ही मागणी करते आहे की रुपाली चाकणकरांना अटक करावी. कारण चाकणकरांना सगळं माहीत असून त्यांनी दडपशाही केली. अत्यंत गंभीर आणि महाराष्ट्रातील खूप मोठं सेक्स स्कँडल आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष असलेल्या रुपाली चाकणकर मुख्य आरोपीशी संगनमत साधून हे सगळं करत होत्या. त्यामुळे रुपाली चाकणकरांना तातडीने अटक करणं गरजेचं आहे.



रुपाली चाकणकर यांनी छत्री धरल्याचा फोटो आहे, पाद्यपूजन करत आहेत तो फोटो आहे. गुरुमाऊलीच्या विरोधात आलेला वर्षभरापूर्वीचा गुन्हा चाकणकर यांनी का दडपला? त्यांना अशोक खरातच्या सगळ्या गोष्टी माहीत होत्या. भोंदूबाबाला त्यांनी सांगितलं होतं की तू काहीही कर मी पदावर बसले आहे.

त्यामुळेच भोंदूबाबाने महिलांवर अत्याचार केले. राज्य महिला आयोग चाकणकरांच्या काळात अशोक खरातच चालवत होता. नीट सगळ्या घटना पाहिल्या तर ही बाब लक्षात येईल असंही रुपाली ठोंबरे पाटील यांनी म्हटलं आहे.

### देवेंद्र फडणवीस कुणालाही वाचवणार नाहीत : रुपाली ठोंबरे

अशोक खरातला दोन मुलं ब्लॅकमेल करत होती. पुण्यात ती दोन मुलं आली होती त्यांच्याबाबतही तडजोड करण्यात आली. पोलिसांनाही सगळ्या गोष्टी मिळाल्या आहेत. मी दोन दिवसांत सामाजिक कार्यकर्त्यांचं नाव जाहीर करणार आहे. एसआयटीने जर नाव जाहीर केलं नाही तर आम्ही उच्च न्यायालयात जाऊन रिट याचिका दाखल करणार आहे. देवाभाऊंवर मला विश्वास आहे ज्या कुणाचा यामध्ये सहभाग आहे त्यांना देवेंद्र फडणवीस वाचवणार नाही याची खात्री मला आहे. अनेक महिलांनी अनेक तक्रारी रुपाली ठोंबरे पाटील यांच्याकडे येत होत्या, अशोक खरातच्या तक्रारी करत होत्या. पण संविधानिक पदाचा वापर करुन चाकणकर यांनी दडपशाही केली असाही आरोप रुपाली ठोंबरे पाटील यांनी केला आहे. त्यामुळे त्यांनी हे धक्कादायक आरोप केले आहेत.

## लोणावळ्यात हायप्रोफाईल जुगार अड्ड्यावर छापा;२२ जणांवर गुन्हा दाखल

**महाईन्यूज । पुणे**

**लोणावळा शहरातील कुणेनामा परिसरातील बंगल्यात सुरू असलेल्या हायप्रोफाईल जुगार अड्ड्यावर शहर पोलिसांनी शनिवारी मध्यरात्री छापा टाकला. या कारवाईत रोख रक्कम, महागडे मोबाईल आणि आलिशान गाड्यांसह एकूण ४९ लाख ६४ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी बंगल्याचा मालक आणि जुगार खेळणाऱ्यांसह एकूण २२ जणांवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




मिळालेल्या माहितीनुसार २१ मार्च रोजी पहाटे ४:४० वाजण्याच्या सुमारास कुणेनामा (ता. मावळ) येथील बंगल्यात ही कारवाई करण्यात आली. करण पाटील याने हा बंगला मालक हनुमंत एकनाथ थोरबोले (रा. आरके हॉटेलशेजारी, वरसोली टोलनाका, ता. मावळ) याच्याकडून ६० हजार रुपये भाड्याने घेतला होता व तेथे हा जुगार अड्डा चालवला जात होता. पोलिसांनी छापा टाकला असता बंगल्यात दोन टेबलांवर ‘फ्लॅश’ नावाचा तीन पानी जुगार खेळताना संशयित सापडले.

पोलिसांनी जुगाराचे साहित्य (प्लास्टिकचे कॉईन, पत्ते), रोख रक्कम, विविध कंपन्यांचे महागडे मोबाईल, सहा आलिशान गाड्या असा एकूण ४९ लाख ६४ हजार ७९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी २२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### यांना केली अटक

विशाल रामदास काळे, अक्षय मानसिंग मोहिते, इम्रान सलीम शेख, अक्षय शंकर शेडगे, जहूर सल्लाउद्दीन अन्सारी, रंगनाथ कारभारी औटी, बजरंग शामलाल गुप्ता, महादेवन आर. के. (सर्व रा. नवी मुंबई), अजित राजकुमार पंचवाणी (उल्हासनगर), अकबर शफी हुसेन, मुकेश सत्यनारायण यादव (मुंबई), गुरुदेव भीमराव जाधव (सर्व रा. मुंबई), नावेद जिगर मेमन (मुंब्रा, ठाणे), जितेंद्र उत्तम परदेशी (दिघी, पुणे), रवी बिपीन सोनपाल (नाशिक), रमणलाखन यादव (उलवे, रायगड), हरिओम कुमार रामबिरसिंग, आकाश भगवती प्रसाद (दोघे रा. वांद्रे, मुंबई), रंजन गायसी, चंदा मगर, मिनुका मोहरजन (सर्व रा. पणजी, गोवा), हनुमंत एकनाथ थोरबोले (बंगला मालक, वरसोली, ता. मावळ).

# जलसंपदा विभागाचा महापालिकेला इशारा

## १४३ कोटींची थकबाकी; पाणीपट्टी भरण्यास विलंबासह पाणी शुद्ध करत नसल्याचा ठपका

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरासाठी पवना धरणातून उचलण्यात येणाऱ्या पाण्याची पाणीपट्टी आणि पाणी शुद्ध करत नसल्याचा ठपका ठेवत आकारलेला दंड अशी १४३ कोटींची थकबाकी तत्काळ भरावी, अन्यथा पाणीपुरवठा खंडित करण्यात येईल, असा इशारा जलसंपदा विभागाने महापालिकेला दिला आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात शहरवासीयांच्या तोंडचे पाणी पळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**




> महापालिकेकडून पाणीपट्टी नियमित भरली जाते. गुरुवारी रात्रीच आठ कोटी सहा लाखांची पाणीपट्टी भरली आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया न केल्यामुळे जलसंपदा विभागाकडून दंड आकारला जात आहे. थकबाकी भरण्याबाबत जलसंपदा विभागाचे पत्र प्राप्त झाले आहे.
>
> \- प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग, महापालिका.

पिंपरी-चिंचवड शहराला प्रामुख्याने मावळातील पवना धरणातून पाणीपुरवठा केला जातो. पवना नदीवरील रावेत बंधारा येथून महापालिका ५५० एमएलडी अशुद्ध पाणी उचलते. हे पाणी निगडी, प्राधिकरणातील जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध केले जाते. त्यानंतर येथून शहरातील विविध भागांतील पाणी टाक्यांमध्ये वितरित केले जाते. दुसरीकडे उन्हाचा चटका वाढताच अपुऱ्या, कमी दाबाने, अशुद्ध पाणी पुरवठ्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. महापालिकेच्या सारथी हेल्पलाइनवर तक्रारींचा पाऊस पडत आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून मंजूर कोट्यापेक्षा जास्त पाणी वापरले जाते. मर्यादेपेक्षा जास्त पाणी वापरल्यास उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण होऊ शकते. त्यामुळे महापालिकेने मर्यादेमध्येच पाण्याचा वापर करावा, अशी सूचना जलसंपदा विभागाने दिली आहे. मात्र, महापालिका मंजूर असलेल्या कोट्याप्रमाणेच पाणी उचलते, असा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे.

### २७५ एमएलडी पाण्यावरच प्रक्रिया

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या १० सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची पाणी शुद्ध करण्याची क्षमता ३४५ एमएलडी आहे. प्रत्यक्षात महापालिकेकडून केवळ २७५ एमएलडी पाणी शुद्ध केले जाते. त्यामुळे उर्वरित पाण्यावर प्रक्रिया न करता नदीत सोडले जात असल्याचा दावा जलसंपदा विभागाने केला आहे. प्रक्रिया केलेले सांडपाणी सिंचनास उपलब्ध करून दिले जात नसल्याचा ठपकाही ठेवला आहे. त्यामुळे महापालिकेला जलसंपदा विभागाकडून दंड आकारण्यात येत आहे.

# 'एचपीव्ही लसीकरण मोहिमेला' नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या वतीने गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी राबविण्यात येत असलेल्या एचपीव्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण मोहिमेला नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, महापालिकेतर्फे आतापर्यंत एकूण ११९ मुलींचे लसीकरण यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले आहे. ही मोहीम केवळ आजारापासून बचाव करण्यापुरती मर्यादित नसून, महिलांच्या दीर्घकालीन आरोग्य सुरक्षिततेसाठी आणि समाजातील कर्करोगाचे प्रमाण कमी करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.**



> एचपीव्ही लसीकरण मोहिमेसाठी सर्व मनपा रुग्णालये व दवाखाने पूर्णतः सुसज्ज असून, आवश्यक मनुष्यबळ, सुविधा आणि औषधसाठा उपलब्ध आहे. तसेच सर्व डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी या मोहिमेची अंमलबजावणी प्रभावीपणे करत आहेत. या मोहिमेद्वारे १४ वर्षांच्या मुलींना मोफत आणि सुरक्षित लस उपलब्ध करून देत भविष्यात गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण कमी करण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे. पालकांनी पुढाकार घेऊन आपल्या मुलींचे लसीकरण वेळेत करून घ्यावे.
>
> – डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात १४ वर्षे वयोगटातील मुलींसाठी एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे.

भारत सरकारच्या सध्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार १४ वर्षांच्या मुली (ज्यांनी १४ वा वाढदिवस साजरा केला आहे पण १५ वर्षे पूर्ण झालेली नाहीत) या एचपीव्ही लसीसाठी पात्र आहेत. तथापि, काही परिस्थितींमध्ये एचपीव्ही लसीकरण दिले जाणार नाही किंवा पुढे ढकलले जाईल. यामध्ये १४ वर्षांच्या लक्ष्य वयोगटाबाहेरील मुली, गर्भधारणा असलेली व्यक्ती, पूर्वी एचपीव्ही लस (गार्डासिल किंवा सर्वाव्हॅक) घेतलेली असल्यास, लस किंवा तिच्या घटकांमुळे (यीस्ट) तीव्र ऍलर्जीचा इतिहास असलेली व्यक्ती तसेच मध्यम ते गंभीर आजार असलेल्या व्यक्तींचा समावेश होतो. अशा प्रकरणांमध्ये संबंधित व्यक्ती पूर्णपणे बरी झाल्यानंतरच लसीकरण करणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत मोफत एचपीव्ही लस दिली जात आहे. तसेच सर्व लाभार्थ्यांची नोंद यू-विन (U-WIN) पोर्टलवर करण्यात येत आहे. नागरिकांनी आपल्या १४ वर्षे वयोगटातील मुलींना नजिकच्या महानगरपालिका रुग्णालयात नेऊन मोफत एचपीव्ही लसीकरणाचा लाभ घ्यावा आणि कर्करोगमुक्त भविष्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी महापालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे करण्यात आले.



## भूमिका

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८,९३१ दिवसांचा कार्यकाळ पूर्ण करत भारतातील सर्वाधिक काळ सरकार प्रमुख राहण्याचा ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे. सिक्कीमचे माजी मुख्यमंत्री पवन कुमार चामलिंग यांचा ८,९३० दिवसांचा विक्रम मागे टाकत मोदी यांनी राजकीय सातत्याचा नवा अध्याय लिहिला आहे.**

# मोदींचा विक्रम : सातत्य, सत्ता आणि जबाबदाऱ्यांची कसोटी

मुख्यमंत्री आणि पंतप्रधान या दोन्ही पदांवरील एकत्रित अनुभवामुळे त्यांनी भारतीय राजकारणात दीर्घकालीन नेतृत्वाचे उदाहरण निर्माण केले आहे. मात्र, कोणताही विक्रम हा केवळ आकड्यांचा खेळ नसतो; तो जनतेच्या अपेक्षा, कामगिरी आणि भविष्यातील जबाबदाऱ्यांची कसोटीही ठरतो.

२००१ मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून सुरुवात झालेला मोदी यांचा प्रवास अनेक संकटांमधून पुढे सरकला. गुजरात भूकंप, दुष्काळ, चक्रीवादळ आणि राजकीय अस्थिरतेच्या काळात राज्याची धुरा सांभाळताना त्यांनी प्रशासनिक क्षमता दाखवली. त्यानंतर पायाभूत सुविधा, उद्योग आणि कृषी क्षेत्रात झालेली प्रगती 'गुजरात मॉडेल' म्हणून चर्चेत आली. या पार्श्वभूमीवर २०१४ मध्ये केंद्रात सत्तेवर येताना त्यांनी विकास आणि सुशासनाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवला. २०१९ आणि २०२४ च्या सलग निवडणुकांतील विजयाने त्यांच्या नेतृत्वावर जनतेचा विश्वास कायम असल्याचे दिसून आले.



दीर्घकालीन सत्ताकाळाचे काही स्पष्ट फायदे असतात.सातत्यपूर्ण धोरणे राबविण्याची संधी मिळते, मोठे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी वेळ मिळतो आणि प्रशासनिक स्थैर्य निर्माण होते. मोदी यांच्या कार्यकाळात पायाभूत सुविधा, डिजिटलायझेशन, परराष्ट्र धोरण आणि सामाजिक योजनांमध्ये काही महत्त्वपूर्ण बदल घडले. भारताची जागतिक पातळीवरील प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्नही या काळात झाला. त्यामुळे हा विक्रम केवळ वैयक्तिक यश नसून भारतीय राजकीय व्यवस्थेतील स्थैर्याचे प्रतीक म्हणूनही पाहिला जाऊ शकतो.

तथापि, दीर्घकाळ सत्तेत राहणे म्हणजे वाढत्या अपेक्षांचे ओझेही असते. बेरोजगारी, महागाई, शेतीतील संकटे, सामाजिक तणाव आणि आर्थिक असमानता यांसारख्या समस्या अद्याप गंभीर आहेत. लोकशाहीत कोणत्याही नेत्याचा कार्यकाळ जितका मोठा, तितकी त्याच्याकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा अधिक असते. त्यामुळे विक्रमाचा उत्सव साजरा करताना जनतेच्या दैनंदिन अडचणींवर प्रभावी उपाययोजना करणे हीच खरी नेतृत्वाची परीक्षा ठरणार आहे.

याशिवाय, मजबूत नेतृत्वासोबत लोकशाही संस्थांची मजबुती आणि पारदर्शकता टिकवून ठेवणेही तितकेच आवश्यक आहे. विरोधकांचा आवाज, माध्यमांचे स्वातंत्र्य आणि संघराज्यीय संतुलन यांचा आदर राखणे हे लोकशाहीचे मूलभूत तत्त्व आहे. दीर्घकालीन सत्तेमुळे निर्णयक्षमता वाढते, पण त्याचवेळी सत्तेचे केंद्रीकरण होण्याची शक्यता देखील वाढते. त्यामुळे संतुलन राखणे ही शासनाची महत्त्वाची जबाबदारी ठरते.

एकूणच, नरेंद्र मोदी यांचा ८,९३१ दिवसांचा विक्रम हा भारतीय राजकारणातील महत्त्वाचा टप्पा आहे. हा विक्रम नेतृत्वातील सातत्य, जनतेचा विश्वास आणि राजकीय स्थैर्य दर्शवतो. परंतु, या यशासोबतच देशाच्या सर्वसमावेशक विकासासाठी ठोस परिणाम देणे, सामाजिक समतेला चालना देणे आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण करणे हीच पुढील काळातील खरी कसोटी ठरणार आहे. विक्रम इतिहासात नोंदवला जाईल; मात्र त्या विक्रमामागील कामगिरीच भविष्य ठरवेल.

## प्रासंगिक »

### अतिरेक नको

***एकदा एक राजहंस एका बगळ्यास म्हणाला, 'काय रे तू आधाशी ! पाण्यात-ला कोणताही प्राणी खायला तू मागेपुढे पहात नाहीस. बरं-वाईट, नासकं हा फर-कसुद्धा तुझ्या खादाड जिभेला समजत नाही.***

माझं पहा, मी फक्त पूर्ण उमलले-ल्या कमळातले तंतु तेवढे खाईन, दुसरा कसलाही पदार्थ माझ्या घशाखाली जाणार नाही.' त्यावर बगळा म्हणाला, 'माझ्या दृष्टीने असा चोखंदळपणा असणं बरं नव्हे. ज्या वेळी जे मिळेल ते खावं अन् सुखी राहावं. खाण्याचा पदार्थ दिसला की तो खावा हेच शहाणपणाचं. असे म्हणून बगळा उडाला व जवळच्या तलावाकाठी गेला. तेथे कडेला एक मासा दिसला. तेव्हा विचार न करता त्याने तो एकदम गिळला, पण आत असलेला गळ घशाला लागून तो जिवास मुकला. राजहंस आपले आवडते खाणे दुसऱ्या कमळे असलेल्या तळ्यात गेला, पण तेथे हंस धरण्यासाठी जाळे लावले होते, त्यात तो सापडला.

**तात्पर्य :**
**कोणत्याही गोष्टीचा अतिरेक नको.**

कोकणचा हापूस आंबा हा केवळ फळ नसून महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा आणि संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे. दरवर्षी गुढीपाडव्यापासून सुरू होणारा हापूसचा हंगाम शेतकरी, व्यापारी आणि ग्राहक यांच्यासाठी उत्साहाचा काळ असतो.

# 'कोकणचा राजा' अडचणीत!

मात्र यंदाच्या हंगामात अवकाळी पाऊस, कीड हल्ले आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे या 'कोकणच्या राजाला' अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे उत्पादन घटले, दर वाढले आणि शेतकऱ्यांसह ग्राहकांच्याही चिंतेत भर पडली आहे.

हापूसच्या उत्पादनात घट होण्यामागे सर्वात मोठे कारण म्हणजे हवामानातील अनिश्चितता. फुलोऱ्याच्या काळात झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि कीड हल्ल्यांमुळे काढणीला विलंब झाला आणि रत्नागिरी व देवगड भागातील आवक कमी झाली. परिणामी बाजारात हापूसच्या पेट्यांचे दर २ हजार ते ८ हजार रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. उत्पादन कमी आणि मागणी जास्त असल्याने दर वाढणे स्वाभाविक असले तरी सर्वसामान्य ग्राहकांच्या आवाक्याबाहेर जाणारी किंमत ही चिंतेची बाब आहे.

दुसरीकडे, आखाती देशांमधील युद्धामुळे हापूसच्या निर्यातीवर



मोठा परिणाम झाला आहे. आखाती देश हे हापूसचे प्रमुख बाजारपेठ असल्याने निर्यात ठप्प झाल्याने व्यापाऱ्यांना आणि शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. निर्यात न झाल्यामुळे स्थानिक बाजारात आंबा मुबलक प्रमाणात उपलब्ध होत असला, तरी त्यातून अपेक्षित नफा मिळत नसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक गणिते बिघडली आहेत. विशेषतः रमजानच्या काळात फळांना असलेली मागणी कमी झाल्याने निर्यातदारांचे नुकसान अधिक वाढले आहे.

यंदाच्या परिस्थितीत आणखी एक गंभीर समस्या म्हणजे बनावट हापूस विक्रीचा वाढता प्रकार. अधिक नफा मिळवण्यासाठी इतर राज्यांतील आंबे 'हापूस' नावाने विकले जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. यामुळे ग्राहकांची फसवणूक होते आणि खऱ्या हापूस उत्पादकांच्या विश्वासार्हतेवरही परिणाम होतो. त्यामुळे शासन आणि बाजार समित्यांनी गुणवत्ता नियंत्रण आणि ब्रँड संरक्षणासाठी कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे.

एकूणच, हापूस आंब्याच्या हंगामावर हवामान बदल, आंतरराष्ट्रीय राजकारण आणि बाजारातील अनियमितता यांचा एकत्रित परिणाम दिसून येत आहे. 'कोकणचा राजा' टिकवायचा असेल, तर शेतकऱ्यांना तांत्रिक मदत, हवामान व्यवस्थापन, निर्यात बाजारपेठांचे विविधीकरण आणि कडक नियंत्रण व्यवस्था यावर शासनाने तातडीने लक्ष देणे ही काळाची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



पंडित शास्त्री होती नीच याती ।
त्यांचे ऐकताती नीति ते धर्म ॥१॥

स्वमुखें ब्राह्मण न करती अध्ययन ।
होती भ्रष्ट जाण मद्यपी ते ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राज्यातील हॉटेल-उपहारगृहांना दिलासा: व्यापारी एलपीजी पुरवठ्यात २०% वाढ

## गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर केंद्राचा निर्णय; एकूण पुरवठा ५०% पर्यंत

**महाईन्यूज । मुंबई**

**अमेरिका-इस्रायलविरुद्ध इराण युद्धामुळे जगभरात गॅस संकट उभे राहिले. त्यात आता राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहारगृहे तसेच औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया-दुग्धव्यवसाय क्षेत्रासाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार या व्यावसायिकांना २० टक्के अतिरिक्त व्यापारी एलपीजी (COMMERCIAL LPG) पुरवठा करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे.**



### राज्यातील हॉटेल-उपहारगृहांना दिलासा

व्यापारी एलपीजी पुरवठ्यात २०% वाढ होणार असून गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने हा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यातील हॉटेल, ढाबे, उपहारगृहे तसेच औद्योगिक कॅन्टीन, अन्नप्रक्रिया व दुग्धव्यवसाय क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार आहे. एकूण गॅस पुरवठा आता ५०% पर्यंत वाढविण्यात येणार असून संबंधित क्षेत्रांना प्राधान्य दिले जाणार आहे. व्यावसायिकांनी तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करणे तसेच पीएनजीसाठी अर्ज करणे बंधनकारक राहणार आहे

केंद्र सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने दिनांक २१ मार्च २०२६ रोजी दिलेल्या सूचनांनुसार, यापूर्वी राज्याला ३० टक्के वाटप मंजूर होते. आता २३ मार्च २०२६ पासून पुढील आदेश येईपर्यंत आणखी २० टक्के वाटप वाढविण्यात आले असून एकूण गॅस पुरवठा पूर्व-संकट पातळीच्या ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. या अतिरिक्त २० टक्के वाटपात हॉटेल, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया व दुग्धव्यवसाय यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टीन, कम्युनिटी किचन्स आणि स्थलांतरित मजुरांसाठीच्या योजनांनाही लाभ मिळणार आहे.

मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले की, या निर्णयामुळे व्यापारी एलपीजीच्या तुटवड्यामुळे अडचणीत आलेल्या हॉटेल आणि उपहारगृह व्यवसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मात्र गॅस मिळविण्यासाठी संबंधित व्यावसायिकांना तेल विपणन कंपन्यांकडे (OMCS) नोंदणी करणे आणि पीएनजी (PNG) साठी अर्ज करणे बंधनकारक राहणार आहे. केंद्राच्या या निर्णयामुळे राज्यातील खाद्यव्यवसायाला मोठा दिलासा मिळणार असून पुरवठा साखळी अधिक सुलभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, राज्यातील केरोसिन वितरणाबाबतही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. प्रलंबित परवाने नूतनीकरण झालेले मानण्यात येणार असून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तसेच वारसांच्या नावे परवाने तात्काळ वर्ग करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या गावामध्ये किरकोळ केरोसिन परवानाधारक उपलब्ध नाहीत, अशा गावांमध्ये रास्तभाव दुकानदारास किरकोळ केरोसिन परवानाधारक समजण्यात येऊन त्यास परवाना देण्यात यावा. राज्यातील किरकोळ, हॉकर्स, अर्धघाऊक व घाऊक केरोसिन परवाने मंजुरी, नुतनीकरण व वारसाच्या नावे वर्ग करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत दिनांक २० मार्च २०२६ च्या शासनपत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

# ज्येष्ठ नेते, राज्याचे माजी मंत्री दत्ता मेघे यांचे निधन...

**महाईन्यूज । नागपूर**

**विदर्भातील ज्येष्ठ राजकारणी, शिक्षणतज्ज्ञ व समाजसेवक तथा राज्याचे माजी मंत्री दत्ता मेघे यांचे रविवारी (२२ मार्च) नागपूर येथे निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने विदर्भासह राज्याच्या राजकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.**



मेघे यांचा जन्म ११ नोव्हेंबर १९३६ रोजी वर्धा जिल्ह्यातील पवनार येथे झाला होता. त्यांनी आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच भाजपमध्ये काम करत चार वेळा लोकसभा खासदार म्हणून नागपूर, रामटेक व वर्धा मतदारसंघांचे प्रतिनिधित्व केले. याशिवाय राज्यसभा सदस्य तसेच महाराष्ट्र विधानपरिषदेतही त्यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली होती. राजकारणासोबतच त्यांनी शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय काम केले. 'नागर युवक शिक्षण संस्था'च्या माध्यमातून तसेच ' दत्ता मेघे इन्स्टीट्यूट ऑफ मेडीकल सायन्स'सारख्या संस्थांच्या उभारणीतून त्यांनी ग्रामीण भागात शिक्षण व आरोग्य सुविधा पोहोचवल्या. त्यांच्या कार्यामुळे विदर्भातील हजारो विद्यार्थ्यांना संधी मिळाली.

मेघे हे विदर्भ राज्याच्या मागणीचे समर्थक म्हणूनही ओळखले जात होते. त्यांच्या कुटुंबातील पुढील पिढीही राजकारणात सक्रिय असून पुत्र समीर मेघे आमदार आहेत. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच विविध क्षेत्रांतून शोक व्यक्त करण्यात येत आहे

# हिंदू संमेलनात राणेंचा इशारा; भोंदूबाबावर कठोर कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी**

**'भोंदूबाबा अशोक खरात याने हिंदू धर्माचे नाव खराब केले आहे. हिंदू समाजात असे क्वचित निघतात. सरकार सर्व पीडित महिलांबरोबर आहे. खरात याच्यावर कडक कारवाई केली जाईल,' अशी ग्वाही मत्स्य व्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिली.**



चिंचवड येथील संभाजीनगर येथे विराट हिंदू संमेलन रविवारी पार पडले. त्यानंतर मंत्री राणे यांनी माध्यमांशी संवाद साधला. आमदार अमित गोरखे या वेळी उपस्थित होते.

मंत्री राणे म्हणाले, 'भोंदूबाबा खरात याच्यावर कडक कारवाई केली जाईल. पीडित महिलांनी सरकारशी संपर्क साधावा. ज्यांच्यावर अन्याय झाला आहे, त्यांच्या पाठीशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खंबीरपणे उभे आहेत.' खरातप्रकरणी आपल्याला समाज माध्यमावर लक्ष केले जात असल्याबाबत विचारले असते मंत्री राणे म्हणाले, 'मला कोणतेही लक्ष केले जात नाही. समाज माध्यमावर सगळ्याच प्रकारचे प्राणी असतात. त्यामुळे मी त्याचा विचार करीत नाही. मुस्लिम समाजाबाबत काही झाले, तर कोण बिळात बसतात हे आम्हालाही माहिती आहे. केवळ हिंदू धर्माची बदनामी करण्यासाठी काही लोकांना फार गुदगुल्या होत आहेत.' 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जन्मशताब्दी वर्षे सुरू आहे. त्यानिमित्ताने राज्य आणि देशभरात हिंदू संमेलने आयोजित केली जात आहेत. यातून हिंदू समाजाला एकत्र आणले जात आहे. हिंदू राष्ट्राला आणखी भक्कम करण्याच्या दृष्टिकोनातून सर्वजण एकत्र येत आहेत,' असेही राणे यांनी सांगितले.

# अमेरिका-इराण तणाव टोकाला; होर्मुझ बंद करण्याचा इराणचा इशारा

## ट्रम्प यांचा ४८ तासांचा अल्टिमेटम; जागतिक तेल व्यापार धोक्यात

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**गेल्या काही दिवसांपासून अमेरिका-इस्रायल आणि इराणमध्ये युद्ध पेटलं आहे. अमेरिका-इस्रायल हे संयुक्तपणे इराणवर हल्ले करत असल्यामुळे इराण हादरलं आहे. या युद्धात आतापर्यंत इराणच्या शेकडो नागरिकांचा मृत्यू झाला आहे. एवढंच नाही तर इराणच्या अनेक नेत्यांचा आणि लष्करी अधिकाऱ्यांचाही मृत्यू झाला आहे. पण तरी हे युद्ध अद्यापही थांबलेलं नाही.**



### तर होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद करणार

'अमेरिकेने इराणच्या वीज प्रकल्पांवर हल्ला करण्याच्या धमक्यांची अंमलबजावणी केली तर होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद केली जाईल', असा मोठा इशारा इराणने रविवारी दिला आहे. इराणच्या खतम अल-अंबिया (KHATAM AL-ANBIYA) या लष्करी कमांड युनिटने हा इशारा दिला आहे.

अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील युद्धामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये तणाव निर्माण झालेला आहे. त्यामुळे कच्च्या तेलाच्या व्यापारात अडथळे निर्माण होत असून याचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे. मात्र, अशा परिस्थितीतही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे रोज इराणला धमकी देणारे वक्तव्य करत आहेत. त्यामुळे हे युद्ध आणखी भडकण्याची चिन्हे दिसून येतात.

दरम्यान, होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याच्या अनुषंगाने डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला मोठा इशारा देत ४८ तासांत सामुद्रधुनी खुली करण्याची धमकी दिली होती. पण या धमकीमुळे इराणने संताप व्यक्त केला आणि त्यानंतर इराणने होर्मुझची सामुद्रधुनी अमेरिका आणि इस्रायल वगळता बाकी सर्वांसाठी खुली करण्याचा निर्णय घेतला. मात्र, हा निर्णय घेतल्यानंतर काही तासांतच आता पुन्हा एकदा याबाबत मोठी अपडेट समोर आली आहे.

"जर इराणचे वीज प्रकल्प उद्ध्वस्त करण्याच्या अमेरिकेने दिलेल्या धमक्यांची अंमलबजावणी झाली तर होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद केली जाईल आणि जोपर्यंत आमचे नष्ट झालेले वीज प्रकल्प पुन्हा बांधले जात नाहीत तोपर्यंत होर्मुझची सामुद्रधुनी सुरू केली जाणार नाही", असं इराणच्या लष्करी कमांड युनिटने सरकारी टिव्हीवर प्रसारित केलेल्या एका निवेदनात म्हटल्याचं न्यूज १८ ने एका वृत्तात म्हटलं आहे.

अमेरिका आणि इस्रायल युद्धामुळे जगभरात ऊर्जा पुरवणाऱ्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या जलमार्ग म्हणजेच होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्येही मोठा तणाव आहे. त्यामुळे जागतिक व्यापार ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. मात्र, ही होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्याच्या पार्श्वभूमीवर डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला मोठा इशारा दिला होता. एका सोशल मीडिया पोस्टमध्ये ट्रम्प यांनी म्हटलं की, "जर हा जलमार्ग पुढच्या ४८ तासांत कोणत्याही धोक्याशिवाय पूर्णपणे खुला झाला नाही, तर अमेरिका इराणच्या सर्वात मोठ्या वीज प्रकल्पापासून सुरुवात करून विविध ऊर्जा प्रकल्पांना उद्ध्वस्त करेल."

## मध्यपूर्व तणावाचा भारतावर परिणाम; पंतप्रधान मोदींची तातडीची बैठक

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**मध्य पूर्वेतील युद्ध परिस्थिती आणि भारतावर त्याचा होणारा परिणाम या विषयावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उच्चस्तरीय बैठक बोलावली होती. या बैठकीला सरकारमधील दिग्गज मंत्री, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मध्य पूर्वेतील सध्याच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पेट्रोलियम, कच्चे तेल, वायू, ऊर्जा आणि खत क्षेत्रांमधील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. तेल, वायू आणि खतांसह जीवनावश्यक वस्तूंचा देशाला अखंड पुरवठा सुनिश्चित करणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता.**



### बैठकीत कोण कोण उपस्थित होते?


केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, रसायन आणि खते आणि आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी, कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडविया आणि इतर वरिष्ठ मंत्री व अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

मध्यपूर्वेतील संकटाच्या पार्श्वभूमीवर तेल, वायू आणि खतांचा अखंड पुरवठा कायम ठेवण्यासाठी सरकार आधीच सक्रिय पावले उचलत आहे. १२ मार्च रोजी पंतप्रधान मोदी म्हणाले की, मध्यपूर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळे जागतिक ऊर्जा संकट निर्माण झाले आहे. ही देशातील लोकांच्या संयम आणि शहाणपणाची परीक्षा आहे. या आव्हानाचा सामना शांतता, संयम आणि जनजागृतीने केला पाहिजे असं आव्हान त्यांनी केले होते.

आमचे सरकार जागतिक पुरवठा साखळीतील व्यत्यय दूर करण्यासाठी सातत्याने काम करत आहे. पुरवठा साखळीतील व्यत्यय दूर केले जातील याची खात्री करण्यासाठी आम्ही काम करत आहोत असंही पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केले. २८ फेब्रुवारी रोजी सुरू झालेला हा संघर्ष अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर अधिकच चिघळला आहे. त्यानंतर इराणने इस्रायल आणि आखाती देशांवर हल्ले करून प्रत्युत्तर दिले. इराणच्या नियंत्रणाखाली असलेली होर्मुझची सामुद्रधुनी हा एक महत्त्वाचा सागरी मार्ग आहे, ज्यामधून जगाच्या ऊर्जा पुरवठ्यापैकी अंदाजे २०% ऊर्जा वाहून नेली जाते. संघर्ष सुरू झाल्यापासून या सागरी वाहतुकीवर गंभीर निर्बंध आले आहेत. ज्यामुळे भारतासह अनेक देशांच्या ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी पंतप्रधान मोदींनी सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, कतार, बहरीन, कुवेत, जॉर्डन, फ्रान्स, मलेशिया, इस्रायल आणि इराणच्या नेत्यांशी दूरध्वनीवरून संवाद साधला आहे. दरम्यान, एलपीजीची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी देशभरात सातत्याने छापे टाकले जात आहेत. देशभरातील बंदरांवरील कामकाज सामान्य असून, कोणत्याही प्रकारची गोंधळ उडाल्याचे चित्र नाही. सरकार आखाती आणि मध्य पूर्वेतील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून असून तेथे राहणाऱ्या भारतीयांची सुरक्षा हे सर्वोच्च प्राधान्य आहे. आखाती देशांमधील भारतीय दूतावास आपल्या नागरिकांच्या सतत संपर्कात असून त्यांना सर्व आवश्यक माहिती पुरवत आहेत. अनेक भारतीय नागरिकांना संघर्षग्रस्त भागातून बाहेर काढून परत आणण्यात आले आहे.

# शर्वरीची दमदार वाटचाल

बॉलीवूडमध्ये वेगाने आपली ओळख निर्माण करणारी अभिनेत्री शर्वरी वाघ आता तिच्या पिढीतील सर्वांत आशादायक स्टार्सपैकी एक म्हणून पुढे येत आहे. मोठे दिग्दर्शक आणि प्रॉडक्शन हाउसेस तिच्यावर विश्वास दाखवत असून, तिच्या आगामी चित्रपटांची यादीही तितकीच दमदार आहे. विशेष म्हणजे शर्वरीचे फक्त २८ दिवसांच्या आत दोन मोठे चित्रपट प्रदर्शित होणार आहेत. 'मैं वापस आऊंगा' हा चित्रपट १२ जून रोजी प्रदर्शित होणार आहे, तर 'अल्फा' १० जुलै रोजी चित्रपटगृहांत धडकणार आहे. त्यामुळे अल्पावधीतच बॉक्स ऑफिसवर स्वतःची ताकद दाखवण्याची मोठी संधी मिळणार आहे. अलीकडेच 'मैं वापस आऊंगा' या चित्रपटाचा टीझर समोर आल्यानंतर सोशल मीडियावर शर्वरीची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. हा चित्रपट दिग्दर्शक इम्तियाज - अली यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होत असून भावनिक कथानकासाठी ते ओळखले जातात. शर्वरीच्या आगामी प्रोजेक्ट्समध्ये 'अल्फा', सूरज बडजात्या यांचा 'ये प्रेम मोल लिया' तसेच अली अब्बास जफर यांच्या पुढील चित्रपटाचा समावेश आहे. या चित्रपटात ती अहान पांडेसोबत दिसणार आहे.



# दिव्यांकाने कन्फर्म केली प्रेगनेन्सी

टेलिव्हिजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री दिव्यांका त्रिपाठी हिने सोशल मीडियावरून चाहत्यांना आनंदाची बातमी दिली. लग्नानंतर १० वर्षांनी ती आणि पती विवेक दहिया आई-वडील होणार आहेत. इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या फोटोंमध्ये ती बेबी बंप फ्लॉन्ट करताना दिसते. भावना व्यक्त करताना या जोडप्याने इंस्टाग्राम पोस्टमध्ये लिहीले की "१० वर्षांनंतर आमच्या कथेत एक नवीन वळण आले आहे. पोस्टमध्ये त्यांनी त्यांच्या आयुष्यातील या नव्या वळणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, लवकरच पालक होणार असल्याचे सांगितले. या जोडप्याने २०१६ मध्ये लग्नगाठ बांधली होती. लग्नाच्या एका दशकानंतर त्यांच्या आयुष्यात येणाऱ्या य नवीन पाहुण्याबद्दल सध्या चित्रपट आणि मालिका सृष्टीसह चाहत्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# रणबीर-कतरिना पुन्हा एकत्र ?

दिग्दर्शक प्रकाश झा यांच्या २०१० मधील सुपरहिट 'राजनीती' चित्रपटाचा सिक्वेल आता चर्चेत आला आहे. 'राजनीती २'ची पटकथा पूर्ण झाली असून लवकरच चित्रीकरणाला सुरुवात होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे या सिक्वेलमध्ये रणबीर कपूर आणि कतरिना कैफ पुन्हा एकत्र दिसण्याची शक्यता आहे. प्रकाश झा चित्रपटाविषयी बोलताना म्हणाले, "राजनीती २'साठी ही योग्य वेळ आहे. पहिल्या भागात जे दाखवले, त्यापेक्षा सांगण्यासारखी कथा अजून खूप बाकी आहे.' या सिक्वेलमध्ये पुन्हा एकदा दिग्गज कलाकारांची फौज बघायला मिळू शकते. यात अजय देवगण, नाना पाटेकर, अर्जुन रामपाल, मनोज बाजपेयी आणि नसीरुद्दीन यांच्याही भूमिका असण्याची शक्यता आहे. पहिल्या 'राजनीती' मध्ये कतरिना कैफने साकारलेले राजकीय पात्र आणि रणबीर कपूरचा दमदार अभिनय प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरला होता. त्यामुळे आता 'राजनीती २'मधून पुन्हा एकदा राजकारण, सत्तासंघर्ष आणि महाभारताची प्रेरणा असलेली कथा मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# नाशिकचा हर्षवर्धन सदगीर 'डबल महाराष्ट्र केसरी'!

## महेंद्र गायकवाडला चितपट करत पटकावली मानाची गदा



**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातील वाघोलीमध्ये पार पडलेल्या ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे विजेतेपद नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर (HARSHWARDHAN SADGIR) याने पटकावले. मनाच्या चांदीच्या गदेसाठी झालेल्या लढतीत हर्षवर्धनने सोलापूरच्या महेंद्र गायकवाडला ४-३ अशा गुणांच्या फरकाने पराभूत केले. त्यामुळे हर्षवर्धन सातवा डबल महाराष्ट्र केसरी ठरला.**




प्रतिष्ठेच्या लढतीसाठी झालेल्या सामन्यात दोन्ही मल्लांनी एकमेकांना अटीतटीची लढत दिली होती. महेंद्र गायकवाडने (MAHENDRA GAIKWAD) सुरुवातीलाच पहिला गुण मिळवला होता. तर नाशिकच्या हर्षवर्धननेही नंतर एक गुण मिळवत बरोबरी केली. दोघेही सुरुवातीपासून आक्रमक खेळत होते.

नंतर महेंद्र गायकवाडला ३० सेंकदाच्या ॲक्टिव्हिटी वेळेत गुण मिळवता न आल्याने हर्षवर्धनला १ गुण मिळाले. पण शेवटच्या क्षणी हर्षवर्धनने दोन गुण मिळवत आघाडी घेतली. शेवटी महेंद्रनेही २ गुण मिळाले. मात्र, वेळ संपल्यानंतर हर्षवर्धनने एका गुणाच्या आघाडीसह महाराष्ट्र केसरी किताब जिंकला. रामकृष्ण अण्णा सातव पाटील यांच्या आयोजनाखाली होत असलेल्या महाराष्ट्र केसरी किताबाच्या लढतीत महेंद्र गायकवाडने माती विभागातून आणि हर्षवर्धन सदगीरने गादी विभागातून प्रवेश मिळवला होता. या किताबाच्या लढतीपूर्वी माती आणि गादी या दोन्ही विभागातील अंतिम सामने पार पडले. माती विभागाचे विजेतेपद महेंद्र गायकवाडने, तर गादी विभागाचे विजेतेपद हर्षवर्धन सदगीरने पटकावले होते.

बाहुबली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महेंद्र गायकवाड आणि माजी महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख यांच्यातील माती विभागातील अंतिम लढत अत्यंत अटीतटीची झाली. पण यात महेंद्र गायकवाडने सुरुतीलाच घेतलेली आघाडी शेवटपर्यंत कायम ठेवली आणि ३-० अशा गुणांच्या फरकाने विजय मिळवला. यामुळे हिंगोलीच्या सिकंदर शेख याचे डबल महाराष्ट्र केसरी होण्याचे स्वप्न भंगले.

दरम्यान, शिवराज राक्षे, पृथ्वीराज पाटील आणि पृथ्वीराज मोहोळ या तिन्ही माजी महाराष्ट्र केसरी विजेत्यांना अंतिम सामन्यापूर्वीच पराभवाचा धक्का बसला होता. यंदा ५ माजी महाराष्ट्र केसरी स्पर्धेत सहभागी झालेले होते. त्यातील सिकंदर आणि हर्षवर्धन यांनी अंतिम फेरी गाठली होती. पण सिकंदरही अंतिम सामन्यात पराभूत झाला.

### हर्षवर्धनने जय पाटीलला केलं चितपट

गादी विभागातील अंतिम सामन्यात २०१९ मधील महाराष्ट्र केसरी विजेता हर्षवर्धन सदगीरसमोर सोलापूरच्या जय पाटीलचे आव्हान होते. या अंतिम सामन्यात हर्षवर्धनने सुरुवातीलाच आक्रमक होत जय पाटीलला चितपट केले. लढतीतील जवळपास ४ मिनिटे शिल्लक असतानाच रिंगणातून जय पाटीलला बाहेर करत हर्षवर्धनने १०-० अशा गुणांच्या फरकाने विजय मिळवला.

# इशानच्या विकेटनंतर शेरेबाजी; संघातच तणावाची चिन्हं?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**आयपीएल हंगामाच्या पार्श्वभूमीवर संघाचा सराव सुरू झाला आहे. अशाच एक सराव सामन्यादरम्यान सनरायझर्स हैदराबादच्या खेळाडूने कर्णधार इशान किशनशी पंगा घेतला आहे.**




उत्तम फॉर्मात असलेल्या इशानने अन्सारीच्या ४ चेंडूत २० धावा चोपून काढल्या. पाचव्या चेंडूवरही इशानने मोठा फटका खेळला. मात्र या खेपेस चेंडू डीप स्क्वेअर लेगच्या क्षेत्ररक्षकाच्या हातात जाऊन विसावला. विकेटनंतर अन्सारीने कर्णधार इशानला उद्देशून शेरेबाजी केली आणि त्याला ड्रेसिंगरुमच्या दिशेने जाण्याचा इशाराही केला. इशानने हसत गंमतीत हा प्रकार सोडून दिला. आपल्याच संघातील गोलंदाजाच्या या वागण्याने इशानही चकित झाल्याचं दिसून आलं.

सनरायझर्स हैदराबाद संघव्यवस्थापनाने काही दिवसांपूर्वीच इशानची कर्णधार म्हणून नियुक्ती केली होती. नियमित कर्णधार पॅट कमिन्स दुखापतीतून अद्यापही पूर्णपणे सावरलेला नाही. कमिन्स हंगामातील सुरुवातीचे काही सामने तरी खेळू शकणार नाही हे स्पष्ट झाल्यानंतर इशानची कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली. नुकत्याच आटोपलेल्या टी२० वर्ल्डकप स्पर्धेत इशानने जवळपास दोनशेच्या स्ट्राईकरेटसह ३१७ धावा केल्या होत्या. यामध्ये तीन अर्धशतकांचा समावेश होता. स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत इशान चौथ्या स्थानी होता. फायनलमध्ये त्याने संजू सॅमसनसह केलेली भागीदारी निर्णायक ठरली होती. इशानच्या नेतृत्वातच झारखंड संघाने देशातल्या सगळ्यात मोठ्या सय्यद मुश्ताक अली स्पर्धेच्या जेतेपदावर नाव कोरलं होतं.

आयसीसीच्या फलंदाजीच्या टी२० क्रमवारीत इशानने दुसऱ्या स्थानी झेप घेतली आहे. पॅट कमिन्ससह ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज जॅक एडवर्ड्सही दुखापतग्रस्त आहे. तो संपूर्ण हंगामात खेळू शकणार नाहीये.

### SRH कॅम्पमध्ये तणाव?

सराव सामन्यात सनरायझर्स हैदराबादच्या कॅम्पमध्ये कर्णधार इशान किशन आणि गोलंदाज अन्सारी यांच्यात शाब्दिक चकमक पाहायला मिळाली. अन्सारीच्या गोलंदाजीवर फटकेबाजी करत असताना इशान बाद झाल्यानंतर त्याच्यावर शेरेबाजी करण्यात आली. इशानने हा प्रकार हसत टाळला असला तरी संघातील वातावरणाबाबत चर्चा रंगली आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। सोमवार ।
दि. 21 मार्च 2026।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## प्लॅस्टिक व राडारोड्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

# पिंपळे गुरवमध्ये कचऱ्याचा डोंगर

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराला देशातील सर्वात स्वच्छ शहर बनविण्याच्या घोषणा प्रशासनाकडून केल्या जात आहेत. मात्र, पिंपळे गुरवमधील मोरया पार्क परिसरातील वास्तव चित्र पूर्णतः विपरीत दिसत आहे. येथील एका मोकळ्या भूखंडावर अक्षरशः कचरा, राडारोड्याचे डम्पिंग ग्राउंड बनले आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांच्या आरोग्याशी उघडपणे खेळ सुरू असल्याचे चित्र समोर आले आहे.**



> परिसर स्वच्छ राहावा यासाठी सर्वांनी काळजी घ्यावी. कुठेही कचरा टाकू नये. तो फक्त घंटागाडीतच टाकावा. कचरा टाकताना नियम मोडताना आढळल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल. शहरातील आठही झोनमध्ये तपासणीसाठी पथके तयार करण्यात आली आहेत. त्यामुळे नागरिकांनी सहकार्य करून कचरा घंटागाडीतच टाकावा.
>
> प्रदीप ठेंगल, उपायुक्त, आरोग्य विभाग, मनपा.

मोरया पार्क परिसरातील या जागेवर काही बेजबाबदार नागरिकांकडून सर्रास कचरा टाकला जात आहे. सडलेले अन्न, प्लॅस्टिक कचरा आणि बांधकामाचा राडारोडा मोठ्या प्रमाणावर रस्त्याच्या कडेला टाकण्यात येत आहे. परिणामी परिसरात कचऱ्याच्या असह्य दुर्गंधीमुळे स्थानिक रहिवाशांचे दैनंदिन जीवन त्रस्त झाले आहे. कचऱ्याच्या ढिगांमुळे डास, माशा आणि भटक्या प्राण्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या गंभीर आजारांचा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यावर याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पिंपळे गुरव येथील मोरया पार्क परिसरातील मोकळ्या भूखंडावर परिसरातील नागरिक कचरा टाकत आहेत. यामुळे मोकाट जनावरे, भटकी कुत्री अन्नाच्या शोधात येथे येतात. कचरा रस्त्यावर व परिसरात पसरवत आहेत. यामुळे परिसराचे विद्रुपीकरणात भर पडत असून भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांच्या जीविताला धोका संभवू शकतो. मोकाट जनावरे प्लॅस्टिक, अन्न खात असल्याने त्यांचे देखील आरोग्य धोक्यात येऊ शकते. यामुळे पालिकेच्या संबंधित विभागाने येथे कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणे गरजेचे आहे.

### परिसरातील नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी संताप

वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी तीव नाराजी आहे. स्मार्ट सिटीच्या नावाखाली केवळ दिखावा केला जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. संबंधित विभागाने तात्काळ परिसराची स्वच्छता करावी. कचरा टाकणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई करावी. सूचना फलक लावून परिसरावर नियंत्रण ठेवावे. नियमित कचरा संकलन व औषध फवारणी सुरू करावी, अशी मागणी होत आहे.

## 'सखी आंगण' उपक्रमाचे मुख्यमंत्र्यांकडून विशेष कौतुक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत आकुर्डी रेल्वे स्थानक परिसरात राबविण्यात आलेल्या 'सखी आंगण' या महिला सक्षमीकरणाच्या अनोख्या उपक्रमाची दखल राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी घेतली आहे. या उपक्रमाबद्दल मुख्यमंत्र्यांनी महापालिका प्रशासन आणि सहभागी महिला बचत गटांचे विशेष कौतुक करत आमदार अमित गोरखे यांना शुभेच्छा पत्र पाठवले आहे.**

हे सन्माननीय पत्र आमदार गोरखे यांनी आज नवनियुक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांच्याकडे सुपूर्द केले. यावेळी आमदार अमित गोरखे यांनी डॉ. विजय सूर्यवंशी यांचे आयुक्त पदाचा कार्यभार स्वीकारल्याबद्दल अभिनंदन केले. या भेटीदरम्यान शहरातील नवीन विकासकामे, पायाभूत सुविधा, वाहतूक शिस्त आणि कायदा व सुव्यवस्था यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर



सकारात्मक चर्चा करण्यात आली. या केंद्राच्या माध्यमातून महिलांना खाद्यपदार्थ, हस्तकला आणि घरगुती वस्तूंच्या व्यवसायाची थेट संधी मिळाल्याने त्यांचे आर्थिक सक्षमीकरण होण्यास मोठी मदत होणार आहे. विशेष म्हणजे, या केंद्राचे सुशोभीकरण आणि प्रसिद्धी करताना डिझायनिंग व मार्केटिंग क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी दिलेले योगदान अत्यंत कौतुकास्पद आहे. तसेच, 'सखी आंगण'मधील भिंतींवर साकारण्यात आलेले महाराष्ट्रातील थोर महिलांचे कार्य आणि विदर्भातील पारंपरिक 'गोंडी चित्रकले'चे दर्शन यामुळे हा प्रकल्प व्यावसायिकतेसोबतच सांस्कृतिकदृष्ट्याही समृद्ध झाला आहे.

# निगडी-आकुर्डी मेट्रोच्या कामामुळे रस्त्यावर चिखल

## स्थानिक नागरिकांकडून याबाबत तीव्र नाराजी व्यक्त; अपघाताचा धोका वाढला

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील निगडी चौक ते आकुर्डी परिसरात सुरू असलेल्या मेट्रो रेल्वेच्या कामांमुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः रस्त्यावर साचलेल्या माती आणि मुरुमामुळे चिखल निर्माण झाला असून, यामुळे वाहनचालकांसाठी धोका निर्माण झाला आहे. दुचाकीस्वारांना या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसत असून, अनेक ठिकाणी घसरण्याच्या घटना घडत असल्याचे समोर आले आहे. परिणामी, अपघातांची शक्यता वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**



स्थानिक नागरिकांनी या परिस्थितीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मेट्रोचे काम सुरू असताना आवश्यक त्या सुरक्षात्मक उपाययोजना न केल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात माती सांडल्याने पावसाचे किंवा पाण्याचे थेंब पडताच चिखल तयार होतो आणि रस्ता अत्यंत घसरडा बनतो. यामुळे सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी परिस्थिती अधिकच बिकट होते.

निगडी ते आकुर्डी हा भाग वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून, दररोज हजारो नागरिक या मार्गाचा वापर करतात. मात्र, सध्या सुरू असलेल्या कामांमुळे वाहतूक कोंडी, धुळीचे प्रदूषण आणि आता चिखलामुळे वाढलेला अपघाताचा धोका या सर्व समस्यांनी नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेकांनी प्रशासनाकडे तक्रारी केल्या असूनही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली दिसून येत नाही.

नागरिकांनी मेट्रो प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. रस्त्यावर साचलेली माती त्वरित हटवणे, नियमित साफसफाई करणे आणि रस्त्यावर पाणी मारून चिखल नियंत्रणात ठेवणे या उपाययोजना आवश्यक असल्याचे सांगितले जात आहे. तसेच, कामाच्या ठिकाणी योग्य बॅरिकेडिंग आणि चेतावणी फलक लावण्याचीही मागणी होत आहे, जेणेकरून वाहनचालकांना आधीच सावधगिरी बाळगता येईल.

दरम्यान, या प्रकरणी मेट्रो अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती मिळत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशामक विभागाने देखील याची दखल घेतली असून, मेट्रो प्रशासनासोबत समन्वय साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. महापालिकेच्या आरोग्य व स्वच्छता विभागाच्या रोड क्लिनर आणि रोड वॉशर वाहनांनाही संपर्क करण्यात येत असून, लवकरच साफसफाईचे काम हाती घेतले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारच्या कामांदरम्यान सुरक्षा आणि स्वच्छतेचे नियम पाळणे अत्यंत गरजेचे असते. अन्यथा नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो. विशेषतः दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक आणि पादचारी यांना याचा अधिक त्रास सहन करावा लागतो.


सध्या परिस्थिती गंभीर बनत चालली असून, प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. अन्यथा एखादा मोठा अपघात घडल्यास त्याची जबाबदारी निश्चित करणे कठीण होईल, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे मेट्रो प्रशासन, महापालिका आणि संबंधित यंत्रणांनी समन्वय साधून त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

मेट्रो कामांमुळे रस्ते अरुंद झाले असून, त्यातच चिखल आणि सांडलेली माती यामुळे वाहनांचा वेग कमी होतो आणि वाहतूक कोंडी निर्माण होते. कोरड्या हवामानात हीच माती धुळीच्या स्वरूपात हवेत उडते, ज्यामुळे प्रदूषण वाढते आणि नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होतो. चिखलयुक्त आणि घसरड्या रस्त्यांमुळे विशेषतः दुचाकीस्वारांना मोठा धोका निर्माण झाला आहे. ब्रेक मारताना किंवा वळण घेताना टायरचा रस्त्यावरचा पकड कमी होतो, त्यामुळे घसरण्याच्या घटना वाढल्या आहेत. अनेक ठिकाणी किरकोळ अपघातांची नोंद होत आहे.

# आकुर्डी येथे भरधाव मोटारीच्या धडकेत एकाचा मृत्यू

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड परिसरात भरधाव मोटारीने दिलेल्या जोरदार धडकेत एका ५९ वर्षीय इसमाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. ही भीषण अपघाताची घटना सायंकाळच्या सुमारास थरमॅक्स चौक ते खंडोबा माळ जाणाऱ्या रस्त्यावर घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.**



मृत्यू झालेल्या इसमाचे नाव फौजदार रामखिलावन यादव (वय ५९, रा. चिखली, पुणे) असे आहे. ते सायंकाळच्या वेळी नेहमीप्रमाणे पायी रस्त्याने जात असताना हा अपघात घडला. या प्रकरणी पोलीस शिपाई सोमनाथ दिवटे यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मोटार चालक संजय रमेश जिंदल (वय ५६, रा. निगडी प्राधिकरण, निगडी) हा आपल्या ताब्यातील मोटार अतिशय वेगाने व बेदरकारपणे चालवत होता. यावेळी त्याने रस्त्याने पायी चाललेल्या यादव यांना पाठीमागून जोरदार धडक दिली. धडकेचा वेग इतका जबरदस्त होता की यादव यांना डोक्याला व हाताला गंभीर दुखापत झाली.

अपघातानंतर घटनास्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. स्थानिक नागरिकांनी तात्काळ जखमी यादव यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्याचा प्रयत्न केला. मात्र डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

दरम्यान, पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी चालक संजय जिंदल याला अटक केली आहे. त्याच्यावर निष्काळजीपणे वाहन चालवून मृत्यू घडवून आणल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास निगडी पोलीस करत आहेत.

या अपघाताच्या पार्श्वभूमीवर परिसरातील नागरिकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याची मागणी केली आहे. विशेषतः शहरातील गजबजलेल्या रस्त्यांवर वेगमर्यादा पाळणे, पादचाऱ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आणि वाहतुकीचे नियम पाळणे अत्यावश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. वाढत्या अपघातांच्या घटनांमुळे प्रशासनानेही याबाबत कठोर पावले उचलण्याची मागणी नागरिकांकडून आणि स्थानिक समजसेवकांकडून होत आहे.

www.rklgis.org

**RKL GALAXY International School**
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

# TEACHERS'
# HIRING

**WALK-IN INTERVIEW**

Hiring teachers for all subjects across Pre-Primary, Primary, and Secondary sections for the academic year 2026–27.
Music, Art & Craft are also welcomed.

## Walk-In Schedule Timings:

- **Monday 23rd March to Saturday 28th March**
- **Monday to Saturday Timings 9:00 AM to 4:00 PM**

## Venue:

RKL Galaxy International School, Sr. No. 149/5, Opp. Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune – 412105

www.rklgis.org 8698360005




Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available.
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046